महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार कक्ष क्र. ४१८,

चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२

Email ID: dattatray.kharge@nic.in

---

क्रमांक: मान्यता २०२१/ (१०५/२१)/ मशि-४ दिनांक : १२ जुलै, २०२१.

प्रति,

कुलसचिव,

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

विषय: शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून नविन अभ्यासक्रम/ विषय/ विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, विद्याशाखा, सॅटेलाईट केंद्र सुरु करण्यास मान्यता देणेबाबत

संदर्भ: शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. मान्यता-२०२१/ (१०५/२१)/ मशि-४ दिनांक १५ जुन, २०२१

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून नविन अभ्यासक्रम/ विषय/ विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, विद्याशाखा, सॅटेलाईट केंद्र सुरु करण्यास मान्यता देणेबाबतचे प्रस्ताव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०८ व १०९ च्या तरतूदीनुसार राज्यातील संबंधित अकृषी विद्यापीठांनी शासनास सादर केले होते. सदर प्रस्तावांची शासननिर्णय दिनांक १३.०९.२०१७ आणि सॅटेलाईट केंद्रांच्या प्रस्तावांची शासननिर्णय दिनांक १८.०९.२०२० अन्वये विहित केलेल्या निकषानुसार तपासणी केली असता निकषांची पुर्तता करणाऱ्या प्रस्तावांना उपरोक्त अधिनियमातील कलम १०९ (३) (घ) व त्याखालील परंतुकान्वये राज्यशासनास असलेल्या अधिकारानुसार संदर्भाधीन दिनांक १५ जून, २०२१ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून शासनाच्या प्रचलित धोरणानुसार कायम विनाअनुदान तत्वावर नविन अभ्यासक्रम/ विषय/ विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, विद्याशाखा, सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

संदर्भाधीन शासननिर्णयामधील प्रपत्र ब व क मधील प्रस्तावांना त्रुट्यांची पुर्तता करण्याच्या अधीन मान्यता देण्यात आली आहे. या प्रस्तावांमधील त्रुट्या सोबत जोडलेल्या विवरणपत्रात दर्शविण्यात आलेल्या आहेत. संबधित संस्थांना त्यांचे प्रस्तावातील त्रुट्या आपल्या स्तरावरुन तात्काळ कळविण्यात याव्यात तसेच शासननिर्णयात नमूद केल्याप्रमाणे या प्रस्तावांमधील त्रुट्यांची पुर्तता केल्याशिवाय महाविद्यालयांना मंजूर करण्यात आलेल्या नविन अभ्यासक्रम/ विषय/ विशेस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, नविन विद्याशाखा यांना संलग्निकरण देण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी व त्याचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

(द.व.खारके)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:- १. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे.

२. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती

३. संबंधित संस्था (विद्यापीठामार्फत)

४. निवड नस्ती (मशि-४)

C:\Users\pranita.raut\Desktop\Extension २०२१-२२\New folder ०४-०६-२१\शासननिर्णय दि.१५.०६.२१ मधील विवरणपत्र ब व क मधील प्रस्तावांना त्रुटी कळविणे\Note २०२१-२२ शासननिर्णय दि.१५.०६.२१ मधील विवरणपत्र ब व क मधील प्रस्तावांना त्रुटी कळविणे.docx

## विवरण पत्र- ब

| | | | |
|---|---|---|---|
| | संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती | | |
| क्र. | संस्थेचे/ महाविद्यालयाचे नाव | प्रस्तावित नवीन अभ्यासक्रम/ विषय/ तुकडी/ विद्याशाखा | शा.नि. दि.१३.०९.२०१७ च्या सपासणीनुसार वस्तुस्थिती |
| १ | २ | ३ | ४ |
| १ | गो.सी.टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदूरबाजार, ता. चांदुरबाजार,जि. अमरावती. | अभ्यासक्रम<br>एम.एस्सी.भाग-१ (भूगर्भशास्त्र)<br>एम.एस्सी.भाग-१ (वनस्पतीशास्त्र) | ८.-नाही. कागदपत्रे जोडले नाहीत |
| २ | श्री.आर.आर.लाहोटी विज्ञान महाविद्यालय, मोर्शी, (१२१) ता. मोर्शी, जि. अमरावती. | अभ्यासक्रम<br>एम.एस्सी.भाग-१ (रसायनशास्त्र) | ११.अ)-नाही-नकाशा प्रमाणित आहे, तथापि इमारतीच्या क्षेत्रफळाचा बोध होत नाही इमारत बांधकामासंदर्भात स्थानिक प्राधिकरणाची कोणतेही प्रमाणित कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| ३ | इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय, अमरावती, (१३४) | अभ्यासक्रम<br>एम.ए.भाग-१ (गृहअर्थशास्त्र)<br>एम.ए.भाग-१ (मराठी) | १०.-नाही-कागदपत्रे जोडलेली नाहीत<br>११.अ)-नाही-भाडेकरारनामा नोंदणीकृत नाही. |
| ४ | श्री.शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,आकोट, (२०३) ता. आकोट, जि. अकोला. | अभ्यासक्रम<br>एम.एस्सी. भाग-१<br>(भौतिकशास्त्र,प्राणिशास्त्र, वनस्पतीशास्त्र,गणित) | ११.नाही. इमारत बांधकामासंदर्भातील स्थानिक प्राधिकरणाची प्रमाणित कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| ५ | मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा, ता. दारव्हा, जि. यवतमाळ (४१३) | अभ्यासक्रम<br>१. एम.एस्सी. भाग-१ (वनस्पतीशास्त्र, प्राणिशास्त्र)<br>२. एम.ए.(अर्थशास्त्र) | ११.अ)-नाही-केवळ अप्रमाणित नकाशा जोडलेला आहे. इमारत बांधकामासंदर्भात स्थानिक प्राधिकरणाचे कोणतेही प्रमाणित कागदपत्रे नाहीत. |
| ६ | लोकनायक बापुजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ (४१२) | अभ्यासक्रम<br>एम.ए. भाग-१<br>समाजशास्त्र | १०.-नाही-केवळ ३८ आर जागा आहे अपूरे क्षेत्राचे कागदपत्रे जोडलेले आहेत.<br>११.अ)-नाही-केवळ अप्रमाणित नकाशा जोडलेला आहे इमारत बांधकामासंदर्भात स्थानिक प्राधिकरणाचे कोणतेही प्रमाणित कागदपत्रे नाहीत. |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | शिवशक्ती कला, वाणिज्य महाविद्यालय, बाभुळगांव, ता. बाभुळगांव, जि. यवतमाळ (४३०) | अभ्यासक्रम<br>एम.कॉम. भाग-१ | ११.अ)-नाही-कोणतेही कागदपत्र जोडलेले नाही |
| ८ | मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय, अमरावती. (१२०) | नवीन विद्याशाखा<br>बी.कॉम.भाग-१ (विद्याशाखा)<br>(इंग्रजी माध्यम) | ११.अ)-नाही-केवळ अप्रमाणित नकाशा जोडलेला आहे. बांधकामासंदर्भात स्थानिक प्राधिकरणाचे कोणतेही प्रमाणित कागदपत्रे नाहीत. |
| ९ | कला व वाणिज्य महाविद्यालय, जरूड, (१३७) ता. वरूड, जि. अमरावती. | नवीन विद्याशाखा<br>बी.एस्सी भाग-१<br>(मराठी,इंग्रजी,भौतिकशास्त्र रसायनशास्त्र,गणित, वनस्पतीशास्त्र,प्राणिशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स,कॉम्पुटर सायन्स) | १०.-नाही-संस्थेच्या नावे ७५ आर जमीन आहे.आवश्यक अकृषक क्षेत्र १ हेक्टर २० आर आहे.(ग्रामपंचायत वरुड) |